**हरि ॐ सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात् । स भूमिं विश्वतो वृत्वाऽत्यतिष्ठद्दशांगुलम् ।। पुरुष एवेदं सर्वं यद्भूतं यच्च भव्यम् । उतामृतत्वस्येशानो यदन्नेनातिरोहति ।। एतावानस्य महिमाऽतो ज्यायांश्च पुरुषः । पादोऽस्य विश्वा भूतानि त्रिपादस्यामृतं दिवि ।। त्रिपादूर्ध्व उदैत्पुरुषः पादोऽस्येहाभवत्पुनः । ततो विष्वङ् व्यक्रामत् साशनानशने अभि ।। तस्माद्विराळजायत विराजो अधिपुरुषः । स जातो अत्यरिच्यत पश्चाद्भूमिमथो पुरः ।। यत्पुरुषेण हविषा देवा यज्ञमतन्वत । वसंतो अस्यासीदाज्यम् ग्रीष्म इध्मः शरद्धविः ।। यं यज्ञं बर्हिर्षि प्रौक्षन्पुरुषं जातमग्रतः । तेन देवा अयजंत साध्या ऋषयश्च ये ।। तस्माद्यज्ञात्सर्वहुतः संभृतं पृषदाज्यं । पशून्तांश्चके वायव्यानारण्यान् ग्राम्याश्च ये ।। तस्माद्यज्ञात्सर्वहुत ऋचः सामानि जज्ञिरे । छंदांसि जज्ञिरे**

**तस्माद्यजुस्तमादजायत ।। तस्मादश्वा अजायंत ये के चोभयादतः । गावो ह जज्ञिरे तस्मात्तस्माज्जाता अजावयः ।। यत्पुरुषं व्यदधुः कतिधा व्यकल्पयन् । मुखं किमस्य कौ बाहू का उरू पादा उच्येते ।। ब्राह्मणोऽस्य मुखमासीद्बाहू राजन्यः कृतः । उरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत ।। चंद्रमा मनसो जातश्चक्षोः सूर्यो अजायत । मुखादिंद्रश्चाग्निश्च प्राणाद्वायुरजायत ।। नाभ्या आसदंतरिक्षं शीर्ष्णो द्यौः समवर्तत । पद्भ्यां भूमिर्दिशः श्रोत्रात्तथा लोकाँ अकल्पयन् ।। सप्तास्यासन्परिधयस्त्रिः सप्त समिधः कृताः । देवा यद्यज्ञं तन्वाना अबध्नन्पुरुषं पशुम् ।। यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् । ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः संति देवाः ।। अतो देवा अवंतु नो यतो विष्णुर्विचक्रमे । पृथिव्याः सप्त धामभिः ।। इदं विष्णुर्विचक्रमे त्रेधा नि दधे पदम् । समूळहमस्य पांसुरे ।। त्रीणि पदा वि चक्रमे विष्णुर्गोपा अदाभ्यः । अतो धर्माणि धारयन् ।। विष्णोः कर्माणि पश्यत यतो व्रतानि पस्पशे । इंद्रस्य युज्यः सखा ।। तद्विष्णोः परमं पदं सदा पश्यंति सूरयः । दिवीव चक्षुराततम् ।। तद्विप्रासो विपन्यवो जागृवांसः समिन्धतेः । विष्णोर्यत्परमं पदम् ।। देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्यानग्नेस्तेजसा सूर्यस्य वर्चसेंद्रस्येंद्रियेणाभिषिंचामि। बलाय श्रियै यशसेन्नाद्याय ॐ भूर्भुवः स्वः अमृताभिषेकोऽस्तु ।। शांतिः पुष्टिस्तुष्टिश्चास्तु ।। श्रीमदनंताय नमः । महाभिषेकस्नानं समर्पयामि ।। स्नानान्ते शुद्धोदकस्नानं समर्पयामि ।।**

(असे म्हणून दोन वेळा फुलाने अनंतावर पाणी प्रोक्षण करावे व नंतर शंखातील पाणी देवावर प्रोक्षण करावे. वरील पुरुषसूक्ताने अभिषेक झाल्यावर पुढील मंत्रानी सुवासिक तेल (अत्तर) लावावे.)

**तैले लक्ष्मीर्जले गंगा यतस्तिष्ठति वै प्रभो । तन्मांगलिकस्नानार्थं जलतैले समर्पये ।। श्रीमदनंताय नमः मांगलिकस्नानं समर्पयामि ।। स्नानांते उष्णोदकस्नानं समर्पयामि ।**

(सुवासिक तेल लावल्यावर देवावर फुलाने कोमट पाणी प्रोक्षण करावे.)

**ॐ तदस्तु मित्रावरुणा तदग्ने शं योरस्मभ्यामिदमस्तु शस्तम् । अशीमहि गाधमुत प्रतिष्ठां नमो दिवे बृहते सादनाय ।। श्रीमदनंताय नमः । सुप्रतिष्ठिमस्तु ।।**

**ॐ तं यज्ञं बर्हिषि प्रौक्षन्पुरुषं जातमग्रतः । तेन देवा अयजंत साध्या ऋषयश्च ये ।। तप्तकांचनवर्णाभं कौशेयं च सुनिर्मितम् । वस्त्रं गृहाण देवेश लक्ष्मीयुक्तं नमोऽस्तु ते ।। श्रीमदनंताय नमः । वस्त्रोपवस्त्रे समर्पयामि ।।** (या मंत्राने कापसाची दोन वस्त्रे वाहावी.)

**वस्त्रानंतरं आचमनीयं समर्पयामि ।।** (या मंत्राने पळीभर पाणी ताम्हनात सोडावे.)

**ॐ तस्माद्यज्ञात्सर्वहुतः संभृतं पृषदाज्यम् । पशून्तांश्चक्रे वायव्यानारण्यान् ग्राम्याश्च ये ।। दामोदर नमस्तेऽस्तु त्राहि मां भवसागरात् । ब्रह्मसूत्रं सोत्तरीयं गृहाण पुरुषोत्तम ।। श्रीमदनंताय नमः । यज्ञोपवीतं समर्पयामि ।। यज्ञोपवीतानंतरं आचमनीयं समर्पयामि ।।**

(या मंत्राने देवाला जानवे घालून ताम्हनात पळीभर पाणी सोडावे.)

**ॐ तस्माद्यज्ञात्सर्वहुत ऋचः सामानि जज्ञिरे । छंदांसि जज्ञिरे तस्माद्यजुस्तमादजायत ।। श्रीखंडं चंदनं दिव्यं गंधाढ्यं सुमनोहरम् । विलेपनं सुरश्रेष्ठ चंदनं प्रतिगृह्यताम् ।। श्रीमदनंताय नमः । विलेपनार्थे चंदनं समर्पयामि ।।** (या मंत्राने गंध वाहावे.)

**अक्षतास्तंडुलाः शुभ्राः कुंकुमेन विरजिताः । मया निवेदिता भक्त्या गृहाण परमेश्वर ।। श्रीमदनंताय नमः । अक्षतान् समर्पयामि ।।** (या मंत्राने देवाला अक्षता वाहाव्या.)

**ॐ तस्मादश्वा अजायंत ये के चोभयादतः । गावो ह जज्ञिरे तस्मात्तस्माज्जाता अजावयः ।। माल्यादीनि सुगंधीनि मालत्यादीनि वै प्रभो । मया हृतानि पूजार्थं गृह्यतां परमेश्वर ।। सेवंतिकाबकुलचंपकपाटलाब्जैः पुन्नागजातिकरवीररसालपुष्पैः ।। बिल्वप्रवालतुलसीदलमालतीभिस्त्वां पूजयामि जगदीश्वर मे प्रसीद ।। श्रीमदनंताय नमः । यथाकालोद्भवपुष्पाणि समर्पयामि ।।** (या मंत्राने देवाला फुले वाहावी.)

## अथ ग्रंथिपूजा ।

**श्रियै नमः । मोहिन्यै नमः । पिद्मिन्यै नमः । महाबलायै नमः । अजायै नमः । मंगलायै नमः । वरदायै नमः । शुभायै नमः । जयायै नमः । विजयायै नमः । जयंत्यै नमः । पापनाशिन्यै नमः । विश्वरूपायै नमः । सर्वमंगलायै नमः । इति ग्रंथिपूजा ।।**

(वरील नाममंत्रानी अनंताच्या १४ ग्रंथींना एकैकशः अक्षता वाहाव्या.)

## अथ अंगपूजा ।

**मत्स्याय नमः । पादौ पूजयामि ।। कूर्माय नमः । गुल्फौ पूजयामि ।। वराहाय नमः । जानुनी पूजयामि ।। नरसिंहाय नमः । ऊरू पूजयामि ।। वामनाय नमः । कटी पूजयामि ।। रामाय नमः । उदरं पूजयामि ।। श्रीरामाय नमः । हृदयं पूजायामि ।। कृष्णाय नमः । मुखं पूजयामि ।। सहस्त्रशिरसे नमः । शिरः पूजयामि ।। श्रीमदनंताय नमः । सर्वांगं पूजयामि ।।**

(वरील नाममंत्राने शरीराच्या अवयवांना उद्देशून देवाला अक्षता वाहाव्या.)

# ।। अथ आवरणपूजा ।।

## अथ पत्रीपूजा ।

**कृष्णाय नमः । पलाशपत्रं समर्पयामि ।।** (पळस) **विष्णवे नमः । औदुंबरपत्रं समर्पयामि ।।** (उंबर) **हरये नमः । अश्वत्थपत्रं समर्पयामि ।।** (पिंपळ) **शंभवे नमः । भृंगराजपत्रं समर्पयामि ।।** (माका) **ब्रह्मणे नमः । जटाधारपत्रं समर्पयामि ।।** (जटामांसी) **भास्कराय नमः । अशोकपत्रं समर्पयामि ।।** (अशोक) **शेषाय नमः । कपित्थपत्रं समर्पयामि ।।** (कवठ) **सर्वव्यापिने नमः । वटपत्रं समर्पयामि ।।** (वड) **ईश्वराय नमः । आम्रपत्रं समर्पयामि ।।** (आंबा) **विश्वरूपिणे नमः । कदलीपत्रं समर्पयामि ।।** (केळ) **महाकायाय नमः । अपामार्गपत्रं समर्पयामि ।।** (आघाडा) **सृष्टिकर्त्रे नमः । पुन्नागपत्रं समर्पयामि ।।** (उंडी) **अनंताय नमः । नागवल्लीपत्रं समर्पयामि ।।** (नागवेल) ।।१४।। (या वेळी वरील प्रत्येक नाममंत्राने सांगितलेली निरनिराळी पत्री वाहावी.)

## अथ पुष्पपूजा ।

**अनंताय नमः । पद्मपुष्पं समर्पयामि ।।** (कमळ) **विष्णवे नमः । जातिपुष्पं समर्पयामि ।।** (जाई) **केशवाय नमः । चंपकपुष्पं समर्पयामि ।।** (चाफा) **अव्यक्ताय नमः । कल्हारपुष्पं समर्पयामि ।।** (पांढरे कमळ) **सहस्त्रजिते नमः । केतकीपुष्पं समर्पयामि ।।** (केवडा) **अनंतरूपिणे नमः । बकुलपुष्पं समर्पयामि ।।** (बकुल) **इष्टाय नमः । शतपुष्पं समर्पयामि ।।** (कमळ) **विशिष्टाय नमः । पुन्नागपुष्पं समर्पयामि ।।** (उंडी) **शिष्टेष्टाय नमः । करवीरपुष्पं समर्पयामि ।।** (कण्हेर) **शिखंडिने नमः । धत्तूरपुष्पं समर्पयामि ।।** (धोतरा) **नहुषाय नमः । कुंदपुष्पं समर्पयामि ।। विश्वबाहवे नमः । मल्लिकापुष्पं समर्पयामि ।।** (मोगरी) **महीधराय नमः । मालतीपुष्पं समर्पयामि ।।** (जुई) **अच्युताय नमः । कर्णिकारपुष्पं समर्पयामि ।।** (कण्हेर)

(या वेळी वरील प्रत्येक नाममंत्राने सांगितलेली निरनिराळी फुले वाहावी.)

**ॐ यत्पुरुषं व्यदधुः कतिधा व्यकल्पयन् । मुखं किमस्य कौ बाहू का ऊरू पादा उच्येते ।। दशांगं गुग्गुलोद्भूतं चंदनागरुसंयुतम् । सर्वेषामुत्तमं धूपं गृहाण सुरपूजित ।। श्रीमदनंताय नमः । धूपं समर्पयामि ।।** (या मंत्राने घंटानाद करत उदबत्ती ओवाळावी.)

**ॐ ब्राह्मणोऽस्य मुखमासीद्बाहू राजन्यः कृतः । ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत ।। साज्यं च**

वर्तिसंयुक्तं वन्हिना योजितं मया। दीपं गृहाण देवेश त्रैलोक्यतिमिरापह ।। श्रीमदनंताय नमः। दीपं समर्पयामि ।। (घंटानाद करत देवाला दिवा ओवाळावा.)

ॐ चंद्रमा मनसो जातश्चक्षोः सूर्यो अजायत । मुखादिन्द्रश्चाग्निश्च प्राणाद्वायुरजायत ।। अन्नं चतुर्विधं स्वादु पयो दधि घृतं तथा। नाना व्यंजनशोभाढ्यं नैवेद्यं प्रतिगृह्यताम् ।। श्रीमदनंताय नमः। नैवेद्यार्थे भक्ष्यभोज्यमहानैवेद्यं समर्पयामि ।। (वरील मंत्राने देवासमोर चौकोनी मंडल करून त्यावर अन्न वाढलेले पान ठेवून त्याचा पुढील मंत्राने नैवेद्य दाखवावा.)

ॐ प्राणाय स्वाहा । ॐ अपानाय स्वाहा । ॐ व्यानाय स्वाहा । ॐ उदानाय स्वाहा । ॐ समानाय स्वाहा । ॐ ब्रह्मणे स्वाहा । नैवेद्यमध्ये पानीयं समर्पयामि ।।

(नंतर ताम्हनात एक पळी पाणी सोडून पुढील मंत्रांनी पुन्हा नैवेद्य दाखवावा.)

ॐ प्राणाय स्वाहा । ॐ अपानाय स्वाहा । ॐ व्यानाय स्वाहा । ॐ उदानाय स्वाहा । ॐ समानाय स्वाहा । ॐ ब्रह्मणे स्वाहा । उत्तरापोशनार्थं ते ददे तोयं सुवासितम् । गृहाण सुमुखी भूयास्त्वमनंत नमो नमः ।। श्रीमदनंताय नमः। उत्तरापोशनं समर्पयामि ।। हस्तप्रक्षालनं समर्पयामि ।। मुखप्रक्षालनं समर्पयामि ।। करोद्वर्तनकं देव मया दत्तं हि भक्तितः । चारुचंद्रप्रभं दिव्यं गृहाण जगदीश्वर ।। श्रीमदनंताय नमः । करोद्वर्तनार्थे चंदनं समर्पयामि ।।

(या मंत्राने नैवेद्य दाखवून ताम्हनात तीन वेळा पाणी सोडून नंतर देवाला गंध लावावे.)

इदं फलं मया देव स्थापितं पुरतस्तव । तेन मे सुफलावाप्तिर्भवेज्जन्मनि जन्मनि ।। श्रीमदनंताय नमः । नारिकेलमहाफलं समर्पयामि ।। पूगीफलं महद्दिव्यं नागवल्लीदलैर्युतम्। कर्पूरैलासमायुक्तं तांबूलं प्रतिगृह्यताम् ।। श्रीमदनंताय नमः । तांबूलं समर्पयामि ।।

हिरण्यगर्भगर्भस्थं हेमबीजं विभावसोः। अनंतपुण्यफलदमतः शांतिं प्रयच्छ मे ।। श्रीमदनंताय नमः ।

सुवर्णपुष्पार्थे निष्क्रयमहादक्षिणां समर्पयामि ।। (या मंत्राने देवापुढे विडा ठेवून त्यावर खारीक, बदाम, नारळ, फळ व महादक्षिणा ठेवून पाणी सोडावे.)

ॐ श्रिये जातः श्रिय आ निरियाय श्रियं वयो जरितृभ्यो दधाति । श्रियं वसाना अमृतत्वमायन्भवंति सत्या समिथा मितद्रौ ।। श्रिय एवैनं तत् श्रियमादधाति संततमृचा । वषट्कृत्य संतत्यै संधीयते प्रजया पशुभिर्य एवं वेद ।। चंद्रादित्यौ च धरणी विद्युदग्निस्तथैव च । त्वमेव सर्वज्योतींषि आर्तिक्यं प्रतिगृह्यताम् ।। श्रीमदनंताय नमः । महानीरांजनदीपं समर्पयामि तथा कर्पूरार्तिक्यदीपं समर्पयामि ।। (या मंत्राने देवापुढे कापूर व काडवाती लावाव्या.)

ॐ नाभ्या आसीदंतरिक्षं शीर्ष्णो द्यौः समवर्तत । पद्भ्यां भूमिर्दिशः श्रोत्रात्तथा लोकाँ अकल्पयन् ।। यानि कानि च पापानि जन्मांतरकृतानि च । तानि तानि विनश्यंति प्रदक्षिणेपदे पदे ।। श्रीमदनंताय नमः । प्रदक्षिणां समर्पयामि ।। (या मंत्राने देवाला प्रदक्षिणा घालाव्या.)

ॐ सप्तास्यासन्परिधयस्त्रिः सप्त समिधः कृताः । देवा यद्यज्ञं तन्वाना अबध्नन् पुरुषं पशुं ।। नमस्ते भगवन् भूयो नमस्ते धरणीधर । नमस्ते सर्वनागेंद्र नमस्ते मधुसूदन ।। श्रीमदनंताय नमः । नमस्कारं समर्पयामि ।। (या मंत्राने देवाला साष्टांग नमस्कार करावा.)

ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् । ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः संति देवाः ।। नमस्ते देवदेवेश नमस्ते गरुडध्वज । नमस्ते कमलाकांत अनंताय नमो नमः ।। श्रीमदनंताय नमः । मंत्रपुष्पं समर्पयामि ।। (देवाला फूल, तुळशीपत्र वाहावे.)

## दोरकप्रार्थना

अनंताय नमस्तुभ्यं सहस्रशिरसे नमः। नमोऽस्तु पद्मनाभाय नागानांपतये नमः ।। अनंतः कामदः

**श्रीमाननंतो मे प्रयच्छतु । अनंतो दोररूपेण पुत्रपौत्रान् प्रवर्धतु ।। श्रीमदनंताय नमः । प्रार्थनापुष्पं समर्पयामि ।।** (या मंत्राने देवाची प्रार्थना करून नमस्कार करावा.)

## अथ दोरकबंधनमंत्रः ।

**अनंतसंसारमहासमुद्रमग्नं समभ्युद्धर वासुदेव । अनंतरूपे विनियोजयस्व ह्यनंतसूत्राय नमो नमस्ते ।। इति बद्ध्वा ।।** (या मंत्राने पुरुषांनी केवड्याचे पान घेऊन अनंत उजव्या हातात बांधावा व स्त्रियांनी केवड्याचे पान घेऊन अनंती डाव्या हाताच्या दंडाला बांधावी.)

## अथ जीर्णदोरकं विसर्जनमंत्रः ।

**नमः सर्वहितानंत जगदानंदकारक । जीर्णदोरममुं देव विसृजेऽहं त्वदाज्ञया ।। इति जीर्णदोरकं विसर्जयेत् ।** (या मंत्राने जीर्ण अनंत विसर्जन करावा.)

**अनेन यथाज्ञानेन यथा मीलितोपचारद्रव्यैः कृतपूजनेन श्रीमदनंतः प्रीयताम् ।।** (असे म्हणून ताम्हनात उदक सोडावे.)

**अद्येत्यादिपूर्वोच्चरितवर्तमान-एवंगुण-विशेषण-विशिष्टायां शुभपुण्यतिथौ मम आत्मनः श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थं श्रीमदनंतदेवताप्रीत्यर्थं तथा अनंतपूजासांगतासिद्ध्यर्थं च ब्राह्मणाय वायनप्रदानं ब्राह्मणपूजनं च करिष्ये । इति संकल्प ।।**

(असा संकल्प करून ताम्हनात पाणी सोडावे. अगोदर ब्राह्मणाचे पूजन करावे.)

**महाविष्णुस्वरूपिणे ब्राह्मणाय इदमासनम्। *स्वासनम् ।।* इदं पाद्यम्। *सुपाद्यम् ।।* इदमर्घ्यम् ।। *अस्त्वर्घ्यम् ।।* इदमाचमनीयम्। *अस्त्वाचमनीयम् ।।* गंधाः पांतु। *सौमंगल्यं चास्तु ।।* अक्षताः पांतु। *आयुष्यमस्तु ।।* पुष्पं पातु। *सौश्रेयसमस्तु ।।* तांबूलं पातु। *ऐश्वर्यमस्तु ।।* दक्षिणाः पांतु। *बहुदेय चास्तु ।। दीर्घमायुः श्रेयः शांतिः पुष्टिस्तुष्टिश्चास्तु ।।***

(तिरप्या अक्षरातील शब्द आशीर्वाद आहेत, ते ब्राह्मणाने म्हणावयाचे आहेत.)

**नमोस्त्वनंताय सहस्रमूर्तये सहस्रपादाक्षिशिरोरुबाहवे । सहस्रनाम्ने पुरुषाय शाश्वते सहस्रकोटीयुगधारिणे नमः ।।**

(वरील मंत्रांनी ब्राह्मणाला गंध, अक्षता, फूल, विडा, दक्षिणा देऊन त्यावर पाणी सोडावे. नंतर ब्राह्मणाच्या मस्तकावर अक्षता वाहून नमस्कार करावा. नंतर पुढील मंत्राने वायन द्यावे.)

## अथ वायनमंत्रः ।

**गृहाणेदं द्विजश्रेष्ठ वायनं दक्षिणायुतम् । त्वत्प्रसादादहं देव मुच्येयं कर्मबंधनात् ।। त्वं गृहाण द्विजश्रेष्ठ अनंतफलदायक। पक्वान्नफलसंयुक्तं दक्षिणाघृतसंयुतम् ।। वायनं द्विजवर्याय दास्यामि व्रतपूर्तये ।। इदं वायनप्रदानं सदक्षिणाकं सतांबूलं अमुकशर्मणे ब्राह्मणाय तुभ्यमहं संप्रददे ।। प्रतिगृह्यताम् ।। (ब्राह्मणः *प्रतिगृण्हामीति वदेत् ।।*) अनेन वायनप्रदानेन श्रीमदनंतः प्रीयताम् न मम ।। विष्णवे नमो विष्णवे नमो विष्णवे नमः ।**

(वरील मंत्रांनी वायनाला गंधाक्षता, फूल, हळदकुंकू वाहून ब्राह्मणाला वायन दिल्यावर उदक सोडावे.)

**कर्मांते द्विराचामेत् ।** (नंतर दोनदा आचमन करावे.)

**।। ॐ तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु ।।**

**।। इति अनंतपूजा समाप्ता ।।**

# ।। अनंत चतुर्दशी व्रतकथा ।।

श्रीगणेशाय नमः ।। फार पूर्वी नैमिषारण्यात चाललेल्या यज्ञसत्रात महामुनी सूत श्रोत्यांना कथानिरूपण करून त्यांच्या कल्याणाच्या गोष्टी सांगत होते. अशाच एका सत्संगात त्यांनी शौनकादी ऋषींना भगवान अनंत आणि त्यांच्या प्रसन्नतेसाठी केल्या जाणाऱ्या अनंत चतुर्दशी व्रताचे माहात्म्य सांगितले. ते म्हणाले, ''पूर्वी धर्मराज युधिष्ठिरांनी गंगातीरी राजसूय यज्ञाचे आयोजन केले. त्यासाठी उत्तम यज्ञशाळा बांधली. त्या यज्ञाला दुर्योधनांदिकांसह पृथ्वीवरील अनेक राजे उपस्थित होते. मय नामक दैत्याने त्या यज्ञशाळेत दृष्टिभ्रम निर्माण करणाऱ्या अनेक अद्भुत रचना केल्या होत्या. जिथे पाणी आहे तिथे भूमीचा व जिथे भूमी आहे तिथे पाण्याचा भास होत असे. जिथे भिंत आहे तिथे द्वाराचा व जिथे द्वार आहे तिथे भिंतीचा भास होत असे.

एकदा दुर्योधन त्या यज्ञशाळेतून हिंडत असताना त्यांना अंगणातील स्फटिकभूमीवर पाणी असल्याचा भास झाला. म्हणून नेसलेले वस्त्र हाताने आवरून ते हळूहळू पुढे जाऊ लागले. थोड्या अंतरावर पाण्याने भरलेला चौक स्फटिकभूमी आहे, असे वाटून ते सरळ चालत गेले व पाण्यात पडले. ती फजिती पाहून द्रौपदी आदी स्त्रियांना, राजांना व ऋषींना हसू आले. दुर्योधनांना तो अपमान वाटला. रागाच्या भरात ते हस्तिनापुरास जाण्यास निघाले. तेव्हा शकुनींनी त्यांना समजावले, म्हणाले, ''राजा! आपल्याला पुढे बरेच कार्य साधायचे आहे. म्हणून आत्ता क्रोध आवरा आणि यज्ञमंडपात चला.'' मामांचे म्हणणे मान्य करून ते शांत झाले आणि यज्ञमंडपात गेले. यथावकाश यज्ञ पूर्ण झाला. इंद्रप्रस्थास आलेले सर्व राजे आपापल्या स्थानी गेले. दुर्योधनही हस्तिनापुरास परतले.

पुढे काही दिवसांनी शकुनींनी दुर्योधनांना आपला कपटहेतू सांगितला, म्हणाले, ''राजा! धर्मराजांना द्यूताची हौस आहे. म्हणून आपण त्यांना द्यूत खेळण्यासाठी निमंत्रित करू आणि त्यांच्याकडून त्यांचे संपूर्ण राज्य व संपत्ती हरण करू.'' त्यांनाही ते पटले. त्यांनी धृतराष्ट्रांकडून पांडवांना निमंत्रण पाठवले. काकांनी बोलावले म्हणून धर्मराज आपले बंधू व द्रौपदींसह तिथे गेले. त्या द्यूतक्रीडेत त्यांनी राज्यासह सर्वस्व गमावले. पांडवांना बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास भोगण्याची वेळ आली.

पांडव वनवासात असताना एकदा भगवान श्रीकृष्ण त्यांना भेटायला गेले. वनवासातील हालअपेष्टांनी व्यथित झालेल्या त्या बंधूंनी व द्रौपदींनी त्यांना नमस्कार करून त्यांचे यथायोग्य आदरातिथ्य केले. प्रारंभिक वार्तालाप झाल्यावर धर्मराज म्हणाले, ''वासुदेव! मी - बंधू आणि पत्नींसह - अरण्यवासाचे दुःख भोगत आहे. तरी कोणत्या उपायाने या दुःखापासून आमची सुटका होईल, ते सांगा. कोणत्या देवाचे पूजन केल्याने अथवा कोणते व्रत केल्याने मला पुनश्च राज्यप्राप्ती होईल व तुमच्या कृपा-प्रसादाने हित होईल, ते सांगा.''

श्रीकृष्ण म्हणाले, ''धर्मराज! अनंतव्रत नावाचे एक उत्तम व्रत आहे. ते भाद्रपद शुद्ध चतुर्दशीला केले जाते. ते स्त्रियांनी वा पुरुषांनी कोणीही करावे. त्या व्रताच्या पुण्यप्रभावाने सर्व पापांचे व दुःखांचे निवारण होते.''

धर्मांनी विचारले, ''हे अनंत कोण? कारण शेष, तक्षक, परमात्मा व परब्रह्म यांनाही अनंत म्हणून संबोधले जाते.''

श्रीकृष्ण म्हणाले, ''अनंत हे माझेच रूप आहे. जो आदित्यादी ग्रहांच्या अनुषंगाने गणला जातो, कला-काष्ठा-मुहूर्त-प्रहर-दिवस-रात्र-पक्ष-मास-ऋतु-वर्ष-युग हेच ज्याचे स्वरूप आहे; तो काळही अनंत नावानेच ओळखला जातो. तो काळ मीच आहे आणि सांप्रत वसुदेवपुत्र कृष्णरूपाने भूमीवरील दैत्यांचा भार उतरवून साधूंचे पालन करण्यासाठी अवतरलो आहे. मीच आदि-मध्य-अंतरहित वैकुंठपती

विष्णू आहे. मीच हर-ब्रह्मा-सूर्य आहे. मीच सर्वव्यापी ईश्वर आहे, सर्वश्रेष्ठ भगवान आहे, संपूर्ण सृष्टीला अंतर्बाह्य व्यापून असलेले परब्रह्म आहे. मीच योगिजनांनी ध्यान करण्यास योग्य असा विश्वरूपी अनंत आहे. अष्टवसू, द्वादश आदित्य, एकादश रुद्र, चौदा इंद्र, सप्त सागर, नद्या, पर्वत, वृक्ष, दिशा, नक्षत्रे, अंतरिक्ष, तसेच भूलोक, भुवर्लोक आदी सर्व भुवने ज्याच्या स्वरूपात राहतात, तो विराटस्वरूप परमेश्वर मीच आहे. अर्थात अनंताचे व्रत हे माझेच व्रत आहे. याविषयी संशय बाळगू नका.''

तेव्हा धर्मराज म्हणाले, ''श्रीकृष्ण! आता मला अनंतव्रताचे माहात्म्य आणि त्याचा विधी सांगा. या व्रताचरणाने काय पुण्य लाभते व काय फलप्राप्ती होते, ते सांगा. तसेच हे व्रत पूर्वी कोणी केले होते व मृत्युलोकी कोणी प्रकट केले, तेही विस्ताराने निवेदन करा.''

श्रीकृष्ण म्हणाले, ''राजा! कृतयुगात सुमंतू नावाचे एक ब्राह्मण होते. वसिष्ठगोत्रोत्पन्न भृगू नामक ब्राह्मणांच्या सुस्वरूप कन्या दीक्षा या त्यांच्या पत्नी. या दंपतीस एक सुलक्षणी कन्या झाल्या. त्यांचे नाव शीला. त्या नावाप्रमाणेच सुशील होत्या. त्या लहान असतानाच त्यांच्या मातोश्रींना ज्वरदाह झाला. त्या वेदना असह्य होऊन त्यांनी नदीत देहत्याग केला. त्या स्वर्गलोकी गेल्या. काही काळाने सुमंतूंनी धर्मपुरुष नामक ब्राह्मणांच्या दुःशीला नाम कन्यांशी विवाह केला. त्या स्वभावाने दुष्ट, कर्कशा, क्रोधी व कलहप्रिय होत्या.

शीला मोठ्या झाल्यावर घरातील सर्व कामांना यथाशक्य हातभार लावू लागल्या. त्या घर स्वच्छ व नीटनेटके ठेवायच्या, पूजेची तयारी करायच्या, तोरणे तयार करायच्या, भिंतींवर-खांबांवर-द्वारावर-उंबरठ्यावर सुंदर चित्रे काढायच्या आणि रंगीबेरंगी रांगोळ्यांनी अंगण सुशोभित करायच्या. हळूहळू त्या उपवर झाल्या. तेव्हा सुमंतूंना त्यांच्या विवाहाची चिंता वाटू लागली. पुढे एके दिवशी कौंडिण्य नामक तरुण, तेजस्वी, तपस्वी ऋषी शिष्यांसह त्यांच्या घरी आले. त्यांनी शीलांना पाहिले व सुमंतूकडे त्यांच्या



कन्यांशी विवाह करण्याची इच्छा प्रकट केली. उभयपक्षी पसंती व संमती मिळाल्यावर त्यांनी शुभ मुहूर्त पाहून त्या दोघांचा विवाह लावून दिला. त्या प्रसंगी सुवासिनींनी मंगलगीते म्हटली, ब्राह्मणांनी स्वस्तिवाचन केले व भाटांनी जयघोष केला.

लग्नसमारंभ झाल्यावर सुमंतू दुःशीलांना म्हणाले, ''आता जावयांना काहीतरी चांगले आंदण दिले पाहिले.'' ते ऐकताच त्या संतापाने आत निघून गेल्या. घरातील द्रव्य पेटीत लपवून ठेवून इकडेतिकडे शोधण्याचे नाटक करत म्हणाल्या, ''जावयांना आंदण म्हणून देण्यास घरात काहीही नाही. त्यामुळे माझा नाइलाज आहे. तुम्ही त्यांना तसाच निरोप द्या.'' ते ऐकून ते फारच खिन्न झाले. त्यांनी महत्प्रयासाने राग आवरला. त्यांच्या पत्नींनी भोजनानंतर पक्वान्नांचा जो चुरा उरलेला होता, तोच जावयांना वाटेत खाण्यासाठी दिला.

कौंडिण्यांनी सुमंतूंचा निरोप घेतला आणि पत्नींसह बैलगाडीत बसून स्वगृही निघाले. बरोबर त्यांचे शिष्यही होते. मार्गात यमुना नदी लागली. तेव्हा कौंडिण्यांनी गाडी थांबवली. ती शिष्यांना सांभाळायला सांगितली आणि माध्यान्हिक संध्यादी कर्मे करण्यासाठी ते नदीवर गेले. शीलाही खाली उतरल्या. त्यांना जवळच रक्तवर्ण वस्त्रे नेसलेल्या काही सुवासिनी दिसल्या. त्या दिवशी भाद्रपद शुद्ध चतुर्दशी असल्यामुळे त्या स्त्रिया मध्यान्हसमयी अनंतरूप जनार्दनांची पूजा करत होत्या. तेव्हा त्या काय करत आहेत, याचे कुतूहल वाटून त्या त्यांच्यावजवळ गेल्या व म्हणाल्या, ''हे आपण काय करत आहात? या व्रताचे नाव काय आहे?'' त्या म्हणाल्या, ''मुली! हे अनंतांचे व्रत आहे आणि त्या व्रताला अनुसरून आम्ही भगवान अनंतांचे पूजन करत आहोत.'' तेव्हा शीला म्हणाल्या, ''हे उत्तम व्रत असेल, तर मीही याचे आचरण करीन. आपण मला या व्रताचा विधी, यात कोणत्या देवांचे कसे पूजन करायचे व कोणते दान द्यायचे; याविषयी सविस्तर सांगा.'' त्या म्हणाल्या, ''मुली! एक शेर उत्तम धान्य घेऊन त्याचे साजूक तुपात

बनवलेले अनरसे, लाडू याप्रमाणे पुल्लिंगवाचक नाव असलेले पक्वान्न बनवावे. त्यातील अर्धे ब्राह्मणाला द्यावे आणि अर्धे आपण भक्षण करावे. ब्राह्मणाला यथाशक्ति दक्षिणा द्यावी. त्यात कंजूसपणा करू नये. हे व्रत नदीच्या किंवा सरोवराच्या तीरावर करावे. कथा श्रवण करावी. दर्भाचा पाच किंवा सात फणांचा शेषनाग करून तो परडीत ठेवावा. स्नान करून सर्वप्रथम त्या शेषाची पूजा करावी. त्याच्यापुढे मंडलदेवतांवर केशर-कुंकुमचर्चित चौदा गाठींचा एक पवित्र दोरक 'अनंत' म्हणून ठेवावा. त्याचे गंध, पुष्प, धूप, दीप व नाना पक्वान्नयुक्त नैवेद्यादी उपचारांनी पूजन करावे. नंतर चौदा गाठींचा तो दोरा - व्रतकर्ता पुरुष असेल, तर त्याने उजव्या मनगटात आणि व्रतकर्ती स्त्री असेल, तर तिने डाव्या मनगटात - बांधावा. दोरा बांधताना -''**अनंतसंसार महासमुद्रमग्न समभ्युद्धर वासुदेव। अनंतरूपे विनियोजयस्व ह्यनंतसूत्राय नमो नमः ।।**''- हा मंत्र म्हणावा. (याचा अर्थ आहे- 'वासुदेव! अंतपाररहित अशा या संसाररूपी महासागरात बुडालेला असा जो मी, त्या माझा उद्धार करा आणि मला आपल्या अनंत स्वरूपात सामावून घ्या. या सूत्ररूप अनंताला माझा नमस्कार असो.) याप्रमाणे हातामध्ये 'अनंत' नामक दोरक बांधून अनंतव्रताची कथा श्रवण करावी. त्यानंतर विश्वरूपी नारायणाचें चिंतन करत स्वस्थ चित्ताने भोजन करावे आणि स्वगृही जावे. असा याचा व्रतविधी आहे.''

श्रीकृष्ण पुढे म्हणाले, ''राजेंद्र! त्या स्त्रियांकडून अनंतव्रताविषयी ऐकून शीला आनंदित झाल्या. त्यांनीही ते व्रत करण्याचे ठरवले. त्यांनी त्या सुवासिनींकडून अनंतरूपी दोरक मागून घेतला. त्याची यथाविधि पूजा केली. तो आपल्या डाव्या हातात (मनगटात) बांधला. त्यांच्याकडे शिदोरी म्हणून पक्वान्नांचा जो चुरा होता, त्यातील अर्धा ब्राह्मणाला दान देऊन अर्धा आपण भक्षण केला. त्यानंतर बैलगाडीत बसून त्या पतींसमवेत त्यांच्या आश्रमात (सासरी) आल्या. त्यांनी केलेल्या अनंतव्रताच्या पुण्यप्रभावाने कौंडिण्यांचा तो आश्रम गोधन, लक्ष्मी आणि धन-धान्याने संपन्न झाला. तिथे अनेक शिष्य

शिकण्यासाठी येऊ लागले, अनेक अतिथी येऊ लागले. त्यांचे पूजन-आदरातिथ्य होऊ लागले. स्वतः शीलाही दिव्य वस्त्रालंकारांनी शोभायमान होऊन आपल्या पतींची सेवा करू लागल्या.

एके दिवशी ती दोघे एकत्र बसून प्रेमाने वार्तालाप करत असताना कौंडिण्यांनी शीलांच्या डाव्या मनगटावर बांधलेला तो अनंत नामक दोरक पाहिला आणि विचारले, ''हा दोरा कसला? हा कशासाठी बांधला आहे? हा मला वश करून ठेवण्यासाठी तर बांधला नाहीत ना? मला याचे खरे कारण सांगा.'' त्या म्हणाल्या, ''नाथ! ज्यांच्या कृपा-प्रसादाने मानवांना धन-धान्यादी सकल समृद्धी प्राप्त होते, त्या भगवान जनार्दनांचे म्हणजेच अनंतांचे प्रतीकस्वरूप असलेला हा दोरा मी आपल्याच कल्याणासाठी विधिपूर्वक पूजन करून धारण केला आहे.'' पण त्यांचे म्हणणे त्यांना पटले नाही. त्यांना अतिशय राग आला. त्यांनी तिरस्काराने तो दोरा तोडला आणि -''कोण, कुठले, कसले अनंत? हे वैभव माझ्या तपश्चर्येचे फलित आहे''- असे म्हणून जवळच्याच अग्नीत भिरकावला. तेव्हा-''हाय हाय! अहो, हे तुम्ही काय विपरीत केलेत!''- असे म्हणून त्या धावत तिथे गेल्या. अर्धवट जळालेला तो दोरा त्या अग्नीतून पटकन बाहेर काढला आणि दुधाच्या पात्रात टाकला.

या दुष्टकर्माचा परिणाम म्हणून कौंडिण्यांची सर्व संपत्ती नष्ट झाली. त्यांच्या असंख्य गायी व गुरे चोरांनी पळवून नेली. त्यांचे घर जळून गेले. द्रव्य गुप्त झाले. अर्थात जे वैभव त्यांच्याकडे आले होते, ते परत निघून गेले. त्यांची स्वजनांशी भांडणे होऊ लागली, बांधवांशी मारामाऱ्या होऊ लागल्या. अशा प्रकारे अनंतांच्या दोऱ्याला अग्नीत टाकण्याच्या दोषामुळे त्यांना अक्षरशः दारिद्र्य प्राप्त झाले. लोकांमध्ये कोणीही त्यांच्याशी भाषण करेना. या दुर्दशेने ते खिन्न, दुःखी व शोकसंतप्त झाले. ते फारच पश्चात्ताप करू लागले. ही व्यथा त्यांनी पत्नींना सांगितली, म्हणाले, ''शीला! सर्व धनाचा क्षय होऊन मला आत्यंतिक दुःख व शोक प्राप्त झाला आहे. माझी आप्तमित्रांशी सतत भांडणे होत असतात. कोणी

माझ्याशी बोलतही नाही. माझे अंतःकरण सतत विषण्ण असते आणि शरीर संतापाने भरलेले असते. यामागे नेमके काय कारण आहे? माझ्याकडून काही अन्याय वा काही प्रमाद घडला आहे का आणि तो तुम्हांला माहीत आहे का? तसेच काय केले असता ही दुःस्थिती जाऊन सुस्थिती येईल, आपले सर्वार्थाने कल्याण होईल, तेही सांगा.'' तेव्हा त्या म्हणाल्या, ''नाथ! आपल्याकडून भगवान अनंतांचा अपराध घडला आहे. आपण माझ्या हातातील त्यांचे प्रतीकस्वरूप असलेला दोरक अग्नीत टाकलात. हे त्याच अपराधाचे फळ असावे, असे मला वाटते. म्हणून आता ते प्रभू पुन्हा प्रसन्न होतील यासाठी प्रयत्न करा.''

तेव्हा तो प्रसंग आठवून कौंडिण्यांना निजकृत्याचे फारच वाईट वाटले. त्यांना पश्चात्ताप झाला. ते मनोमन अनंतांना शरण गेले आणि निराहार राहून तपश्चर्या करावी, असा विचार करून अरण्याकडे निघाले. मार्गाने जात असताना त्यांच्या मनात -'ज्यांच्या प्रसादाने मला धनादी वैभव प्राप्त झाले, त्या अनंतांचे मला कुठे दर्शन होईल? मी त्यांचा अपमान केल्यामुळे ते माझ्यावर रुष्ट झाले आहेत. ते पुन्हा कसे प्रसन्न होतील?'- हेच विचारचिंतन चालले होते.

वनातून जात असताना त्यांना एक आम्रवृक्ष दिसला. त्यावर पुष्कळ आंबे होते, पण एकही पक्षी त्यावर फिरकत नव्हता. शिवाय ते आंबेही किडींनी भरले होते. त्यांनी त्याला विचारले, ''तू अनंतांना कुठे पाहिले आहेस काय? तसे असेल तर मला त्यांचा ठावठिकाण सांग. कारण त्यांच्या दर्शनासाठी मी अक्षरशः तडफडतो आहे.'' तो म्हणाला, ''मी त्यांना कुठेही पाहिलेले नाही.'' त्या उत्तराने त्यांची निराशा झाली, तरी ते पुढे निघाले. त्यांना एक सवत्स धेनू दिसली. त्यांनी तिला विचारले, ''तू अनंतांना कुठे पाहिले आहेस काय?'' ती म्हणाली, ''मी त्यांना कुठेही पाहिलेले नाही.'' ते पुढे निघाले. मार्गात हिरव्यागार गवतामध्ये त्यांना एक बैल दिसला. त्यांनी त्याला विचारले, ''तू अनंतांना कुठे पाहिले आहेस

काय?'' तो म्हणाला, ''नाही, मी त्यांना पाहिलेले नाही.'' पुढे गेल्यावर त्यांना एकमेकांत मिसळलेली दोन रम्य तळी (सरोवरे) दिसली. ती विशाल होती व पाण्याने भरलेली होती. त्यांच्या लाटा परस्परांमध्ये जात होत्या. त्यांच्यात विविध प्रकारची कमळे होती. त्यांच्या तीरावर अनेक पक्षी विहार करत होते. कौंडिण्यांनी त्या तळ्यांना विचारले, ''तुम्ही अनंतांना कुठे पाहिले आहे काय?'' त्यांनी उत्तर दिले, ''आम्ही त्यांना कुठेही पाहिलेले नाही.'' त्यामुळे निराश झालेले ते ऋषी तसेच मार्गस्थ झाले. काही अंतरावर त्यांना एक गाढव व एक हत्ती दिसला. त्यांनी त्यांनाही अनंतांचा ठावठिकाणा विचारला असता त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

अशा प्रकारे मार्गात भेटणाऱ्या प्रत्येकाला विचारूनही भगवान अनंतांचा शोध लागला नाही, म्हणून कौंडिण्य फार हताश झाले. अनिवार दुःखाने व्याकूळ होऊन ते प्रभूंना आर्ततेने हाका मारू लागले, त्यांचा धावा करू लागले, रडू लागले. शोकावेग असह्य होऊन त्यांना मूर्च्छा आली. काही वेळाने शुद्धीवर आल्यावर ते -'प्रभू अनंत! प्रभू अनंत!'- अशा टाहो फोडत इतस्ततः भटकू लागले. शेवटी आपले जीवन व्यर्थ आहे असे वाटून त्यांनी प्राणत्यागाचा निश्चय केला. मग वेलीचा फास तयार करून तिचे एक टोक झाडाच्या फांदीला बांधले आणि फास आपल्या गळ्यात घातला. तेव्हा त्यांचा निर्वाणीचा निश्चय पाहून भगवान अनंत कळवळले. त्यांनी निजकृपेने विप्ररूपाने त्यांना दर्शन दिले. त्यांना आत्मघातापासून परावृत्त करून आपल्याजवळ बोलावले. मग त्यांना समवेत घेऊन एका भुयारात प्रवेश केला. तिथून दिव्य स्त्री-पुरुषांनी युक्त असलेल्या आपल्या वैभवशाली नगरीत नेले. तिथे विप्ररूप टाकून आपल्या सिंहासनाधिष्ट दिव्य चतुर्भुज स्वरूपात दर्शन दिले. त्यांनी शंख, चक्र, गदा, पद्म, कौस्तुभमणी, वनमाला, मुकुट व कुंडले धारण केली होती. त्यांच्यासमोर गरुड आणि पार्श्वभागी नंद-सुनंदादी पार्षद उभे होते.

त्यांच्या दर्शनाने कौंडिण्य धन्य झाले. त्यांनी प्रभू अनंतांना साष्टांग नमस्कार केला. त्यांची मनोभावे

स्तुती केली. त्यांचा जयजयकार केला. ''आज माझा जन्म सफल झाला, सार्थकी लागला''- असे म्हणून कृतज्ञता व्यक्त केली. तेव्हा प्रसन्न झालेले भगवान अनंत म्हणाले, ''द्विजवर्य! तुमच्या मनात काय आहे ते सांगा.'' तेव्हा ते म्हणाले, ''प्रभो! मी पापकर्मे करणारा असल्यामुळे केवळ पापरूपी आहे. मी मनानेही पापांचे चिंतन करणारा असून पापापासूनच माझी उत्पत्ती झालेली आहे. तरी माझी सर्व पापे हरण करून माझे रक्षण करा. देवा! मी ऐश्वर्यमदाने उन्मत्त होऊन तुमचा अनंत नामक दोरक तोडला. त्या दुष्कर्माने माझे सर्व वैभव नाहीसे झाले. माझे स्वजनांशी कलह होऊ लागले. लोक माझ्याशी भाषण करेनासे झाले. त्यामुळे मी व्यथित होऊन तुमच्या दर्शनासाठी तळमळत अरण्यात हिंडत असताना तुम्ही निजकृपेने मला दर्शन दिलेत. आता दोरक तोडलेल्या पापाची कशाने शांती होईल, ते सांगा.''

अनंत म्हणाले, ''कौंडिण्य! आता तुम्ही आपल्या घरी जा. चौदा वर्षे भक्तिपूर्वक अनंतव्रताचे आचरण करा. त्यायोगे तुम्ही सर्व पापांपासून मुक्त व्हाल. तुम्हांला पुत्रपौत्रादिकांची प्राप्ती होईल. तुम्ही सर्व लौकिक भोग भोगाल. तुम्हांला निरंतर माझे स्मरण राहिल्यामुळे देहान्तानंतर तुम्ही मलाच येऊन मिळाल. आता मी तुम्हांला आणखी एक वर देतो. जे कोणी हे शुभकारक अनंतव्रत करतील व हे उत्तम आख्यान श्रवण-पठण करतील, तेही पापमुक्त होऊन परम गतीस प्राप्त होतील. आता ज्या मार्गाने अरण्यात आलात, त्याच मार्गाने घरी जा.''

कौंडिण्य म्हणाले, ''प्रभो! तुम्ही निजकृपेने मला कृतार्थ केले आहे. या व्रताचे मी चौदा वर्षे निःसंशय पालन करीन. आता कुतूहल म्हणून विचारतो - अरण्यातून हिंडत असताना मी एक आम्रवृक्ष, एक गाय, एक कृशकाय बैल, एकमेकांत मिसळलेली दोन सरोवरे, एक गाढव व एक हत्ती पाहिला. ते सर्व माझ्याशी बोलले. ते सर्व कोण होते? शेवटी एक ब्राह्मण भेटले. ते कोण होते?''

अनंत म्हणाले, ''द्विजवर्य! तुम्ही जो आम्रवृक्ष पाहिलात, तो पूर्वजन्मी वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण होता. पण त्याने कोणालाही विद्या शिकवली नाही. त्यामुळे त्याला वृक्षजन्म मिळाला आणि ज्याप्रमाणे पूर्वजन्मी त्याची विद्या कोणाच्याही उपयोगी पडली नाही, त्याप्रमाणे या जन्मातही त्याची फळे निरुपयोगी ठरली आहेत. तुम्ही जी गाय पाहिलीत ती पृथ्वी होती, जो बैल पाहिलात तो प्रत्यक्ष धर्म होता. तुम्ही जी तळी पाहिलीत, त्या पूर्वजन्मातील बहिणी होत्या. त्या दोघींनी जे काही द्यायचे, ते एकमेकींनाच दिले. पण दुसऱ्यांना कधीच काही दिले नाही. आजही ती दोन्ही तळी एकमेकांना आपल्या लाटा देत आहेत. तुम्ही पाहिलेला गाढव हा तुमचाच क्रोध होता. तुम्ही पाहिलेला हत्ती हा तुमच्याच तपश्चर्येचा गर्व होता. मीच ब्राह्मणरूपाने तुम्हांला दर्शन दिले. ज्या विवरात मी तुम्हांला नेले, ते जन्म-मरणरूप संसारविवर होते.''

अशा प्रकारे कौंडिण्यांची जिज्ञासापूर्ती करून देवाधिदेव भगवान अनंत अंतर्धान पावले. त्यानंतर - जे काही घडले, ते स्वप्न होते की सत्य? - असे आश्चर्य करत कौंडिण्य निजगृही परतले. त्यांनी पुढील चौदा वर्षे अनंतव्रताचे आचरण केले आणि अनंतांच्या वरदानानुसार सर्व ऐहिक भोग भोगून अंती भगवान अनंतांच्या धामी गेले.''

भगवान श्रीकृष्ण धर्मराज युधिष्ठिरांना म्हणाले, ''राजा! याप्रमाणे मी तुम्हांला व्रतांमधील सर्वोत्तम आणि महाफलदायी अनंतव्रताचे माहात्म्य आणि त्याचा विधी निवेदन केला आहे. या व्रताचे तुम्ही आचरण करा. हाच तुमच्या दुःखमुक्तीचा उपाय आहे. या व्रताच्या पुण्यप्रभावाने तुमचे सर्व इच्छित मनोरथ पूर्ण होतील. ही कथा श्रवण-पठण करतील, ते पापरहित होऊन अंती हरिपदाला पावतील. जे संसाररूपी गहन अरण्यातील गुहांमध्ये सुखाने विहार करू इच्छितात, त्यांनी त्रिभुवनेश्वर अनंतांचे व्रत करून आपल्या उजव्या हातावर अभिमंत्रित केलेला चौदा ग्रंथीचा अनंत नामक दोरक बांधला आणि भगवान अनंतांचे स्मरण करतच सर्व भोग भोगले, तर तेही शेवटी वैकुंठास अर्थात अनंतरूपी हरिपदास प्राप्त करतात.''

**॥ श्रीमद् अनंतव्रतकथा समाप्त ॥**

## ।। श्रीअनंत-अष्टोत्तशत-नामावली ।।

१. ॐ अनंताय नमः ।
२. ॐ अच्युताय नमः ।
३. ॐ अद्भुतकर्मणे नमः ।
४. ॐ अमितविक्रमाय नमः ।
५. ॐ अपराजिताय नमः ।
६. ॐ अखंडाय नमः ।
७. ॐ अग्निनेत्राय नमः ।
८. ॐ अग्निवपुषे नमः ।
९. ॐ अदृश्याय नमः ।
१०. ॐ अत्रिपुत्राय नमः ।
११. ॐ अट्टहासाय नमः ।
१२. ॐ अनाकुलाय नमः ।
१३. ॐ अघनाशिने नमः ।
१४. ॐ अनघाय नमः ।
१५. ॐ अप्सुनिलयाय नमः ।
१६. ॐ अर्हाय नमः ।
१७. ॐ अष्टमूर्तये नमः ।
१८. ॐ अनिरुद्धाय नमः ।
१९. ॐ अनिर्विण्णाय नमः ।
२०. ॐ अचंचलाय नमः ।
२१. ॐ अष्टदिक्पालमूर्तये नमः ।
२२. ॐ अखिलमूर्तये नमः ।
२३. ॐ अव्यक्ताय नमः ।
२४. ॐ अरूपाय नमः ।
२५. ॐ अनंतरूपाय नमः ।
२६. ॐ अभयंकराय नमः ।
२७. ॐ अक्षराय नमः ।
२८. ॐ अभ्रवपुषे नमः ।
२९. ॐ अयोनिजाय नमः ।
३०. ॐ अरविंदाक्षाय नमः ।
३१. ॐ अशनवर्जिताय नमः ।
३२. ॐ अधोक्षजाय नमः ।
३३. ॐ अत्रिपुत्राय नमः ।
३४. ॐ अंबिकापतिपूर्वजाय नमः ।
३५. ॐ अपस्मारनाशिने नमः ।
३६. ॐ अव्ययाय नमः ।
३७. ॐ अनादिनिधनाय नमः ।
३८. ॐ अप्रमेयाय नमः ।
३९. ॐ अघशत्रवे नमः ।
४०. ॐ अमरारिघ्ने नमः ।
४१. ॐ अमरविघ्नहंत्रे नमः ।
४२. ॐ अनीश्वराय नमः ।
४३. ॐ अजाय नमः ।
४४. ॐ अनादये नमः ।
४५. ॐ अमरप्रभवे नमः ।
४६. ॐ अग्राह्याय नमः ।
४७. ॐ अक्रूराय नमः ।
४८. ॐ अनुत्तमाय नमः ।
४९. ॐ अह्ने नमः ।
५०. ॐ अमोघाय नमः ।
५१. ॐ अक्षयाय नमः ।

५२. ॐ अमृताय नमः ।
५३. ॐ अघोरवीर्याय नमः ।
५४. ॐ अव्यंगाय नमः ।
५५. ॐ अविघ्नाय नमः ।
५६. ॐ अतींद्रियाय नमः ।
५७. ॐ अमिततेजसे नमः ।
५८. ॐ अष्टांगन्यस्तरूपाय नमः ।
५९. ॐ अनिलाय नमः ।
६०. ॐ अवशाय नमः ।
६१. ॐ अणोरणीयसे नमः ।
६२. ॐ अशोकाय नमः ।
६३. ॐ अनुकूलाय नमः ।
६४. ॐ अमिताशनाय नमः ।
६५. ॐ अरण्यवासिने नमः ।
६६. ॐ अप्रमत्ताय नमः ।
६७. ॐ अनलाय नमः ।
६८. ॐ अनिर्देश्यवपुषे नमः ।
६९. ॐ अहोरात्राय नमः ।
७०. ॐ अमृत्यवे नमः ।
७१. ॐ अकारादिहकारांताय नमः ।
७२. ॐ अनिमिषाय नमः ।
७३. ॐ अस्त्ररूपाय नमः ।
७४. ॐ अग्रगण्याय नमः ।
७५. ॐ अप्रथिताय नमः ।
७६. ॐ असंख्याय नमः ।
७७. ॐ अमरवर्याय नमः ।
७८. ॐ अन्नपतये नमः ।
७९. ॐ अमृतपतये नमः ।
८०. ॐ अजिताय नमः ।
८१. ॐ अपांनिधये नमः ।
८२. ॐ अपांपतये नमः ।
८३. ॐ असुरघातिने नमः ।
८४. ॐ अमरप्रियाय नमः ।
८५. ॐ अधिष्ठानाय नमः ।
८६. ॐ अरविंदप्रियाय नमः ।
८७. ॐ अरविंदोद्भवाय नमः ।
८८. ॐ अष्टसिद्धिदाय नमः ।
८९. ॐ अनंतशयनाय नमः ।
९०. ॐ अनंतब्रह्मांडपतये नमः ।
९१. ॐ अशिववर्जिताय नमः ।
९२. ॐ अतिभूषणाय नमः ।
९३. ॐ अविद्याहराय नमः ।
९४. ॐ अतिप्रियाय नमः ।
९५. ॐ अकल्मषाय नमः ।
९६. ॐ अकल्पाय नमः ।
९७. ॐ अब्दादिकाय नमः ।
९८. ॐ अचलरूपाय नमः ।
९९. ॐ अघोराय नमः ।
१००. ॐ अक्षोभ्याय नमः ।
१०१. ॐ अलक्ष्मीशमनाय नमः ।
१०२. ॐ अतिसुंदराय नमः ।
१०३. ॐ अमोघौघाधिपतये नमः ।
१०४. ॐ अक्षताय नमः ।
१०५. ॐ अमितप्रभावाय नमः ।
१०६. ॐ अवनीपतये नमः ।
१०७. ॐ अर्चिष्मते नमः ।
१०८. ॐ अपवर्गप्रदाय नमः ।

## श्रीगणपतींची आरती

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची । नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची । सर्वांगी सुंदर उटि शेंदुराची । कंठीं झळके माळ मुक्ताफळांची ।।१।। जय देव जय देव जय मंगलमूर्ती । दर्शनमात्रें मनकामना पुरती ।।धृ० ।। रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा । चंदनाची उटी कुंकुमकेशरा । हिरेजडित मुगुट शोभतो बरा । रुणझुणती नूपुरें चरणीं घागरिया ।। जय० ।। २।। लंबोदर पितांबर फणिवरबंधना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना । दास रामाचा वाट पाहे सदना । संकटी पावावे निर्वाणीं रक्षावें सुरवरवंदना ।। जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।दर्शन० ।।३।।

## श्रीअनंतांची आरती

आगमी निगमीं तुझा न कळेची अंत। भक्तिभावें प्रेमे भक्तां वर देत। मुनिजन लक्षीं लक्षितां नव्हे तू प्राप्त। शेष सहस्रमुखी वर्णितां श्रमत ।।१।। जय देव जय देव जय श्रीअनंता। आरती ओवाळू तुज आनंदभरिता ।। धृ०।। भाद्रपदचतुर्दशिव्रता जे जन आचरती। षोडश पूजा करूनी ब्राह्मण पूजिती। गोधुमवायन चौदा द्विजांसि अर्पिती। त्यासी सर्वही सिद्धी देसी श्रीपती ।। जय०।।२।। कौंडिण्य ब्राह्मण व्रत हें आचरला। करुणासागर तया प्रसन्न झाला। भक्तीचा अंकुर त्रिभुवनी विस्तरला। एका जनार्दन चरणीं नीवाला ।।३।। जय देव०।।

## मंत्रपुष्पांजली

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् । ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः । ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने । नमो वयं वैश्रवणाय कुर्महे । स मे कामान् काम कामाय मह्यं । कामेश्वरो वैश्रवणो ददातु। कुबेराय वैश्रवणाय। महाराजाय नमः । ॐ स्वस्ति । साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्यायी स्यात् सार्वभौमः सार्वायुष आंतादापरार्धात् पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिति। तदप्येषः श्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन् गृहे । आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ।।

* * *

आमच्या येथे सर्व प्रकारची धार्मिक, आध्यात्मिक, ज्योतिष व शालेय पुस्तके तसेच नविन वर्षाच्या दिनदर्शिका व डायऱ्या होलसेल व किरकोळ दराने मिळतील.

# तुकाराम बुक डेपो

१७/ सी.पी.टँक रोड, गिरगांव, मुंबई - ४०० ००४.
दुरध्वनी : २२४२१६८९/ २२४०५७९८

Astro • Puja • Vastu

# FALIT JYOTISH AND VASTU SHASTRA CONSULTANT

## FOR ALL DHARMIK POOJA'S

SHRI GANESH PUJA

SHRI SATYANARAYAN PUJA

VASTU SHANTI

WEDDING | SAKHARPUDA | MUNJ

JANANA SHANTI | RUDRABHISHEK

SAPTASHATI PATH | HAVAN | ETC.

## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

**SANPADA OFFICE**
Office No. 8, 1st Floor, Shiva Triveni Galleria CHS., Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai - 400705.

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai - 400043.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers

hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com